MHPU080010312019

नि. फौजदारी खटला क्र. २३६/२०१९

सरकार विरुध्द सुधीर दिवटे

निशाणी ३५

सदर अर्ज अभियोग पक्षातर्फे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ प्रमाणे डॉ. कल्पना बलीवंत व गोरोबा आवटे जन माहिती अधिकारी यांना साक्षीसमन्स काढणेकरीता आहे.

२) अर्ज, म्हणणे व प्रकरणाचे अवलोकन केले.

३) अर्जाप्रमाणे थोडक्यात कथन असे की, निशाणी ३० व ३१ वर खबरीने प्राप्त केलेले मुळ दस्त दाखल केलेले आहेत. सदर दस्त व त्यामधील मजकूर सिध्द करणे आवश्यक आहे. शेवटी त्याकरीता उपरोक्त नमूद साक्षीदारांना साक्षीसमन्स काढणेची विनंती केली.

४) निशाणी ३६ प्रमाणे आरोपीचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जातील मजकूर सत्य नाही. दाखल दस्त हा समोरील प्रकरणाचा विषय नाही. नमूद तरतूदीनुसार अभियोग पक्षाचे प्रकरणातील उणीव भरुन काढता येणार नाही. शेवटी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

५) दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

६) अभियोग पक्षातर्फे युक्तीवाद करणेत आला की, नमूद दस्त निशाणी ३१ हा आरोपीला दुसऱ्या बेकायदेशिर विवाहापासून झालेल्या मुलाबाबतचे जन्म प्रमाणपत्र आहे. भा.दं.वि. कलम ४९४ चा आरोप आहे व छळाच्या आरोपाच्या संबंधात देखील दस्त आहे. आरोपीतर्फे म्हणणे प्रमाणे युक्तीवाद करणेत आला. फौ.प्र.सं. कलम ३११ प्रमाणे योग्य निर्णयाकरीता कोणत्याही व्यक्तीस साक्षी समन्स काढले जावू शकते. समोरील प्रकरण पाहता डॉ. कल्पना बलीवंत यांची साक्ष महत्वाची असल्याचे दिसून येते. करिता खालील प्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

१) अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२)     डॉ. कल्पना बलीवंत, दुय्यम प्रबंधक व वैद्यकीय अधिकारी, पुणे म.न.पा. यांना साक्षीसमन्स काढणेत यावे.

SHARAD GINYANADEV DUBALE

Digitally signed by SHARAD GINYANADEV DUBALE
Date: 2024.12.09 16:06:10 +0530

(श.गि.दुबाले)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खडकी, पुणे.

दिनांक ०९/१२/२०२४